**मे. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई, महाराष्ट्र याच्या प्रस्तावित सुधारणा प्रकल्प उभारणीबाबत दि. ०७/१२/२०१६ रोजी झालेल्या जनसुनावणीचे इतिवृत्त...**

मे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड यांचे सध्या सुरु असलेल्या प्रकल्पांचे पूर्णत्व व तीन नवीन, सुधारणा प्रकल्पाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक ०७/१२/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता सी.एस.आय.ए. प्लॉट, हॉटेल ललीत शेजारी, आंतरराष्ट्रीय विमानतळ रोड, अंधरी (पू.), मुंबई- ४०० ०५९. येथे मा. श्री. कुमार खैरे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या जनसुनावणीकरिता खालील शासकीय प्रतीनीधी हजर होते.

1) **श्री. कुमार खैरे** – **अध्यक्ष**
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

२) **श्री. मधुकर लाड,** – **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
मुंबई.

२) **श्री. रविंद्र आंधळे** – **संयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
मुंबई-२

४) **श्री. जयराम पवार**
उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

**जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे** -

प्रारंभी संयोजकांनी अध्यक्षांचे व सर्व सदस्यांचे स्वागत केले, त्यानंतर त्यांनी मा. अध्यक्षांच्या सहमतीने जनसुनावणीसाठी प्रारंभ केला.
त्यानंतर संयोजकांनी पर्यावरणावर होणा-या परिणामांच्या मुल्यांकना संबंधी दि. १४.०९.२००६ रोजीच्या प्रसीध्दीपत्रकात पायाभुत प्रकल्पासंबंधी असणा-या तरतूदीची माहिती व ते म.प्र.नि. मंडळातर्फे कशा पध्दतीने पूर्णत्वास नेले जाते याबाबतची माहिती दिली. सदर जनसुनावणी करिता "नवशक्ती" या मराठी दैनिकात व "फ्रि प्रेस जर्नल" या इंग्रजी दैनिकामध्ये दि. ०४/११/२०१६ रोजी जनसुनावणीच्या म्हणजेच ३० दिवस अगोदर जाहिरात दिली असल्याचे सांगितले. आजच्या तारखेपर्यंत, सदर जनसुनावणी संबंधी कोणत्याही प्रकारची जसे सूचना, हरकती, शंका इ.लेखी स्वरूपात, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, मुंबई येथे प्राप्त झाल्या नाहीत असे सांगितले.

त्यानंतर संयोजकांनी प्रकल्पाच्या पुरस्कर्त्यांना सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरणावर होणारे परिणाम, त्याबाबतच्या उपाययोजना व त्यांचे सादरीकरण करण्यास सांगितले. त्यांनी जनसुनावणीस

हजर असलेल्या उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत त्यांच्या काही हरकती, शंका, सुचना, मते, इ. देण्यात/ मांडण्यास याव्यात असेही सांगीतले.

प्रकल्प पुरस्कर्त्यांच्या प्रतिनीधींनी सदर प्रकल्पाची गरज व त्याच्या एकूण स्वरूपाबाबत माहिती दिली. मियाल (MIAL) या संस्थेने पर्यावरणावर होणा-या परिणामांचे मुल्यांकन (EIA) चा अभ्यास केला असून त्याबाबतची पर्यावरण मंजुरी/ अनुमती (Environment Clearance) २००७ मध्ये घेतली आहे. यामधील काही प्रकल्पाची कामे अपूरी आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ॲप्रॉन भागाचे बांधकाम, टॅक्सीसाठी रस्ते, टर्मिनल T2चे उत्तर दक्षिण व दक्षिण पुर्व व इतर विमानतळा संबंधीच्या सुविधांचा समावेश आहे, की ज्यांना २००७ च्या पर्यावरण मंजुरी अहवालामध्ये मान्यता मिळाली आहे. याशिवाय सध्याच्या विमानतळाची वाहतुक क्षमता ४० दशलक्ष प्रवासी प्रती वर्षी एवढी असून ती ५२ दशलक्ष एवढी करण्याकरिता तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वीत होण्यासाठी ५ ते ७ वर्षाचा लागणारा कालावधी गृहीत धरून आणखी ३ नवीन प्रकल्पांची गरज आहे असे सांगितले.

सदर प्रकल्पामध्ये, सहार टर्मिनल व सांताक्रुज टर्मिनल येथील विद्यमान एप्रन जोडण्यासाठी धावपट्टी क्रमांक १४-३२च्या खालून जाणाऱ्या भुयारी मार्गाचे बांधकाम, M टॅक्सीमार्गांचा विस्तार व नविन एटीसी टॉवर (सुरक्षा यंत्राणाना आवश्यक असल्यास) यांचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित प्रकल्पांचे बांधकाम हे ५० दशलक्ष प्रवासी प्रती वर्षी इतकी वाहतुक २०२० पर्यंत होईल असे गृहीत धरून केले आहे. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळास होणा-या विलंबामुळे, छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई यावर अतिरिक्त बोजा वाढत असून, देशी तसेच विदेशी प्रवाशांना चांगल्या प्रकारच्या सोईसुविधा देण्याकरिता सध्याच्या विमातळाची क्षमता व सुरक्षितता वाढविणे गरजेचे आहे.

या प्रकल्पाबाबत नेमलेल्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पासंबंधी पर्यावरणाच्या अनुषंगाने विस्तृत माहितीचे सादरीकरण केले. सध्यस्थितीमध्ये प्रकल्पाच्या ठिकाणी असणाऱ्या हवेचे, पाण्याचे व ध्वनीचे मोजमाप/निरिक्षण केले असून ते योग्य त्या प्रमाणात आहे असे सांगितले. तसेच सदर प्रकल्पाच्या बांधकामामुळे हवेच्या प्रदुषणामध्ये तात्पुरत्या स्वरुपात वाढ होऊ शकते असे सांगितले. त्यावर असणा-या उपाययोजना जसे, कामाच्या ठिकाणी व रस्त्यावर रहदारीच्या वेळी सतत पाणी फवारणी, वृक्षारोपण करणे, वाहनांवर अतिरिक्त भार न देणे , मालवाहू गाड्यांवर कव्हर घालणे , गाड्यांची नियमित देखभाल इ. प्रकल्प पुरस्कर्त्याकडून घेतल्या जातील असे सांगितले. या सर्व गोष्टींमुळे प्रदूषण कमी होईल व पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही. पर्यावरण अभ्यास अहवालानुसार या प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम नगण्य आहेत व त्यांचे उपशमन पर्यावरण व्यवस्थापन योजना राबवून केले जाईल. पर्यावरण सल्लागारांनी सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणासंबंधी सर्व नियमांचे व अटींचे काटेकोरपणे पालन करून ते अंमलात आणले जातील याची ग्वाही दिली.

तदनंतर संयोजकांनी उपस्थित असलेल्या नागरिकांना सदर प्रकल्पाबाबत त्यांच्या काही सुचना, शंका, हरकती इ. असल्यास त्या मांडण्याबाबत विनंती केली.

त्याबाबतचा वृत्तांत खालील प्रमाणे :-

१) **श्री. सुनिल हते**

**प्रश्न** :-आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जमिनीवर असणा-या झोपडपट्टीची पुनर्वसनाबाबतची परिस्थितीत काय आहे?

**उत्तर**:- महाराष्ट्र शासनाने, विमानतळाभोवती असणा-या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याकरिता १८००० सदनिका कुर्ला येथे बांधल्या आहेत. सदर बाबत, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या आदेशानुसार याबाबतचे सर्वेक्षण केल्यानंतर त्यासाठी असणा-या पात्र व अपात्र झोपडपट्टी धारकांचा संख्या कळेल, व सर्वेक्षणानंतर १८००० सदनिकाशिवाय इतर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्विकासासंबंधीचे धोरण ठरविण्यात येईल. मियाल ने स्पष्ट केले आहे की प्रस्तावित सुधारणा प्रकल्प हे १९ एकर वरील झोपडपट्टी पुनर्वसनानंतरच (महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार) घेतले जातील, म्हणूनच मियालने याकामासाठी ५ ते ७ वर्षांचा कालावधी मागितला आहे

२) **श्री. सुनिल हते**

**प्रश्न** :-सर्वेक्षणा बद्दल आक्षेप नाही परंतु झोपडपट्टी धाराकांना नोटीस देण्यात येत असून ते घाबरले आहेत, त्याबद्दल सांगावे.

**उत्तर**:- सदर नोटीस या उप-जिल्हाधिकारी (अति/निष्का) - बांद्रा, घाटकोपर, भांडुप, अंधेरी यांचेकडून देण्यात येत असून त्यामध्ये, सर्वेक्षण होणारी तारीख व वेळापत्रकाची माहिती असून सर्वेक्षणाच्यावेळी सदर लोकांनी त्यांच्या घरी असावे जेणेकरून आधार कार्ड व ओळखपत्र इ. उपलब्ध होईल यासाठी आहे. याबाबत, अदयाप पर्यंत महाराष्ट्र शासनाने धोरण निश्चिंत केले नसल्याने झोपडपट्टीचा ताबा सोडण्याबाबत नोटीस देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

३) **श्री. बनाप्पा (अशोक नगर, विलेपार्ले)**

**प्रश्न** :- अ) आंबेडकर नगर येथील पुलाची स्थिती अतिशय वाईट असून एम.सी. छागला मार्ग येथे सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाइपलाइनमधून गळती होत आहे. सदर नाला अतिशय लहान असून तो वारंवार तुंबतो, त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. सदरबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तपासणी करावी.

ब) सहार इलिव्हेटेड रोडच्या प्रकल्पामुळे कांजुरमार्ग येथे काही लोकांचे पुनर्वसन झाले आहे. सध्यस्थितीत एमएमआरडीए, इतर शासकीय संस्था व मियाल (MIAL) सहार इलिव्हेटेड रोडच्या प्रकल्पामुळे बाधित लोकांना कांजूर मार्ग येथे पुनर्वसीत करण्यात अपयशी ठरले आहेत.

क) समतानगर येथील भुखंड व CPWD गोडाऊन मियालने ताब्यात घेतले असून त्यांस संरक्षण कुंपण नाही व त्याठिकाणी अस्वच्छता आहे, त्याचा दुरूपयोग होत असून त्याबाबत योग्य त्या उपाययोजनाबाबत सूचीत केले.

**उत्तर :-**

सदरबाबत (पुनर्वसनाबाबत) मियाल (MIAL) ने कोणतीही ग्वाही दिली नसून ते महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार होईल. अंदाजे १८००० सदनिकाचे बांधकाम कुर्ला येथे झाले आहे. याबाबतचा अंतीम निर्णय सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाल्यानंतर मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र व महाराष्ट्र शासन घेतील.

गेल्या ४ वर्षापासून प्रत्येक वर्षी मियाल (MIAL) ने आंबेडकर नगर येथील रस्त्याच्या डागडुज्जीचे काम केले आहे. तसेच पाईपलाईन बाबत, श्री. एम. आर लाड यांनी MIAL ने बृहन्मुंबई महानगरपालिकेला, (MCGM) ला लेखी कळवावे असे सूचित केले.

समतानगर येथील सुरक्षा व स्वच्छतेबाबत येत्या दोन दिवसात योग्य त्या सुविधा पुरविल्या जातील याची हमी दिली.

४) **श्री. विष्णू सरोदे (एम.सी. छागला मार्ग)**

**प्रश्न** :- अ) मा. मुख्यमंत्र्यांनी पुनर्वसनाबाबत आश्वासन दिले आहे. पंरतु आम्ही ७ कि. मी. दुर विद्याविहार येथे जाण्यास इच्छुक नसून आम्हास विमानतळाच्या १ कि. मी. परिक्षेत्रामध्ये पुनर्वसित करावे.

ब) मियाल (MIAL) ने रिलायन्स इंडस्ट्रीज लि. यांना १ करोड रु. भाडे तत्वावर देवून रस्त्याचे उत्खनन करून केबल टाकली परंतु त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीज लि. रस्त्याचे डागडुगीचे काम केले नाही. खासदार व आमदार फंडामधुन रस्ते दुरूस्तीचे काम होत असताना महाराष्ट्र सरकार अशा कामासाठी फंड का देते व रिलायन्सकडून मियाल (MIAL) ने भाडे का घेतले?

**उत्तर :-**

मियाल (MIAL) कडून कोणत्याही संस्थेस विमानतळाच्या जागेवरील कामाबाबत नाहरकत पत्र देण्यात येत नाही. मियाल (MIAL) कडून फक्त ठेव घेण्यात येते व ती कामाच्या पुर्ततेनंतर परत करण्यात येते. जर एम सी छागला मार्ग येथील रस्त्याच्या डागडुगाचे काम रिलायन्स कडून पुर्ण झाले नसेल तर मियाल (MIAL) त्याबाबत त्वरीत योग्य ती कारवाई करेल.

**५) श्री. एम. आर. लाड, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ**

**प्रश्न** :-अ) एकूण किती घरगुती सांडपाणी प्रक्रीया केंद्रे उभारली आहेत ती पुरेशी आहेत का?

ब) घातक घनकचरा विल्हेवाटीसाठी नेमका कोठे पाठविण्यात येणार आहे.?

**उत्तर :-**

१) सदर ठिकाणी तीन घरगुती सांडपाणी प्रक्रीया केंद्रे उभारली असून त्यांची एकूण एकत्रित क्षमता १५ एम एल डी इतकी आहे.

२) घातक घनकचरा तळोजा येथील सार्वजनिक घातक घनकचरा विल्हेवाट केंद्र येथे पाठविण्यात येणार आहे.

६) **श्री. किशोर शेंडे (जीवशास्त्रज्ञ)**

**प्रश्न**:- सदर प्रकल्पाच्या उभारणी वेळी किती वृक्षांवर /झाडांवर त्याचा परिणाम होईल? तसेच देशी प्रजातीच्या झाडांचा वापर हिरवा पट्टा तयार करण्यासाठी करावा.

**उत्तर** :- सदर प्रकल्पाच्या कालवधीत, १८४ वृक्ष पुनर्रोपीत करावे लागणार असून याव्यतिरिक्त अन्य काही झाडांची नव्याने लागवड करण्यात येणार आहे त्यावेळी, श्री शेंडे यांच्या सूचनेची जास्तीत जास्त दखल घेणेत येईल .

७) **श्रीमती. राधीका (कांदिवली)**

**प्रश्न** :-सदर प्रकल्पाच्या बांधकामावेळी होणा-या हवेचे व ध्वनीचे प्रदुषण नियंत्रण करण्याकरिता कोणकोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

**उत्तर** :-

१) वाहनांकरिता भुयारीमार्ग बांधण्यात येईल.

२) विमानांचे संचलन डीजीसीए/आयसीएओ/युएसईपीए यांच्या मानांकनानुसार केला जाईल.

३) टॅक्सिइंगच्या वेळी विमानाच्या एकाच इंजिनचा वापर करून कार्बन मोनॉक्साईड व हायड्रोकार्बन या प्रदुषकांवर नियंत्रण करण्यात येईल.

४) हवेचे प्रदुषण कमी करण्याकरिता हरित पट्टा तयार केला जाईल.

५) अतिरिक्त विद्युत जनित्रांचा वापर टाळण्यात येईल.

**<u>बांधकामाच्यावेळी घेण्यात येणा-या उपाययोजना</u>**

1) सदर प्रकल्प बांधकामाच्या ठिकाणांना संरक्षित कुंपण घालून योग्य ती काळजी घेणेत येईल.
2) सदर प्रकल्पासाठी खोदकाम / मालवाहतूक करताना निर्माण होणाऱ्या धूलिकणांचे प्रदूषण, पाण्याची फवारणी वारंवार करून नियंत्रित केले जाईल.
3) मशीनमधील ध्वनी प्रदूषणाच्या स्रोताजवळ सायलेन्सर बसवणे

८) **श्रीमती. राजेश्री झगडे (बोरिवली)**

**प्रश्न**- सदर प्रकल्प हा मोठा असून पाण्याची गरज भागविण्यासाठी पावसाच्या पाण्याचा पुर्नवापर इत्यादी सारख्या काही उपाययोजना केल्या आहेत का ?

**उत्तर** :- पावसाच्या पाण्याचे हार्वेस्टिंग व शुद्ध केलेले सांडपाणी हे दोन महत्वाचे मुद्दे आहेत. सदर प्रकल्पामध्ये छतावरून पडणा-या पावसाचे पाणी जमिनीखालील रिचार्ज खड्डयामध्ये व सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जाईल, त्यामुळे महानगरपालिकेकडून अतिरिक्त ताज्या पाण्याची गरज भासणार नाही.

९) **श्री. सुंदर परमुख**

**प्रश्न** :- सहार इलिव्हेटेड रोड च्या बांधकामा दरम्यान बरीच झाडे तोडली गेली परंतु नवीन वृक्ष लागवड एमएमआरडीए अथवा मियाल यांच्याकडून झाली नाही. स्थानिकांना वृक्षतोडीबाबत कोणतेही

पत्र देण्यात आले नाही. सहार इलीव्हीटेड रोड च्या बांधकामावेळी झोपडयांचे पुर्नवसन व्यवस्थीतरित्या एमएमआरडीए कडून झाले नाही. सध्या त्याचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी यांचेकडून पोलिस संरक्षणामध्ये होत आहे. त्यामध्ये पर्यावरणाची भरपुर प्रमाणात हानी होत असल्याने म.प्र. नि. मंडळ व पर्यावरण विभाग यांचेकडून सदर प्रकल्पास परवानगी देण्याअगोदर योग्यरित्या छाननी व्हावी.

**उत्तर** :- सर्वेक्षण हे एमएमआरडीए, जिल्हाधिकारी इत्यादींच्या मार्फत महाराष्ट्र शासनाकडून शासनाच्या सध्यस्थितीमध्ये असणा-या नियमावली नुसार होत आहे. सर्वेक्षण हे मियाल कडून होत नाही.

जनसुनावणीचे अध्यक्ष मा. कुमार खैरे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणाच्या दृष्टीने अजूनही काही कोणाच्या हरकती, सुचना, शंका इत्यादी आहेत का याबाबत विचारणा केली असता उपस्थितांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारची शंका, सूचना, हरकती उपस्थित केल्या नाहीत. सदर जनसुनावणी उत्साहात व शांततेत पार पडल्याबद्दल त्यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक आभार मानले. जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या इतर मुद्दांवर व पर्यावरणाशी संबंधित मुद्दांवर मुख्यत्वे हवा, पाणी, माती, ध्वनी इ. वर होणाऱ्या परिणामाबाबत सांगितले व सदर प्रकल्पाचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याबाबत सर्व उपस्थितांनी साधक बाधक चर्चा केली. कमीत कमी वृक्षातोड व देशी झाडांची लागवड करणे तसेच स्थानिक नागरिकांना सदर प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये, या नागरिकांच्या सूचनांवर सर्व संबंधित उपस्थित अधिकाऱ्यांनी नियमानुसार उचित कार्यवाही करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर प्रकल्पाबाबतचा संपूर्ण अहवाल पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पुढील उचित कार्यवाहीस्तव पाठवला जाईल अशी उपस्थितांना माहिती देण्यात आली तसेच सदर जनसुनावणी दरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न ब त्यांचे निरसन इ. बाबत माहिती देखील पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठवली जाईल असे सर्व उपस्थितांसमोर स्पष्ट करणेत आले.

शेवटी, संयोजकांनी पुन्हा एकदा सदर प्रकल्पाबाबत उपस्थितांच्या / रहिवाशांच्या काही शंका, सूचना, हरकती असल्यास लेखी स्वरूपात आजच तात्काळ देणेबाबत सूचित केले म्हणजे सदर हरकतीबाबत जनसुनावणी अहवालात योग्य ती नोंद घेतली जाईल.तथापि सदर दिवशी व वेळी लेखी स्वरूपात कोणीही, कोणत्याची स्वरूपाची सूचना, हरकत दाखल केलेली नाही, त्यानंतर संयोजकांनी मा. अध्यक्षांच्या अनुमतीने जनसुनावणीसाठी आलेल्या सर्व उपस्थितांचे हार्दिक आभार मानून सदर जनसुनावणीचे कामकाज संपुष्टात आल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (श्री. रविंद्र आंधळे) | (श्री. मधुकर लाड) | (श्री. कुमार खैरे) |
| संयोजक तथा | सदस्य तथा | अध्यक्ष तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिकअधिकारी, | जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, |
| म.प्र.नि.मंडळ,मुंबई | म.प्र.नि.मंडळ,मुंबई | मुंबई उपनगर जिल्हा |